# हंगामाच्या समयी आनंद करा



सुगी- हंगामाच्या समयी इतरांना सहभगी करून घद्दन बवाजने कृतज्ञता व्यक्त केली.

**प्रार्थना:** प्रिय प्रभू, मुलांना सुगी आणि तू दिलेले उतम आशीर्वाद याबद्दल तुझे आभार मानण्यास कृपा करुन साहाय्य कर. बवाजप्रमाणे आम्हीही तुझ्या आशीर्वादांमध्ये इतरांना सामावून घेद्दन आमची कृतज्ञता व्यक्त करावी याकरीता आमचे साहाय्य कर.''

## देवाला धन्यवाद द्या

मुलांनी ते कशाबद्दल देवाला धन्यवाद देतात ते सांगावे. ह्या आर्शिर्वादंबद्दल मुलांना प्रर्थना करुन देवाला धन्यवाद देण्यास सांगा

शिक्षकांनी किंवा मोठया मुलाने रुथ अध्याय2 मधील वृत्तांत वाचून दाखववा किंवा सांगावा. यात हंगामाच्या काळत बवाज रुथशी कसा दयाळपणे वागला हे सांगितले आहे.

इतरांना आशीर्वादां मध्ये सहभागी करुन घद्दन बवाजने देवाला  धन्यवाद दिले ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा. मुलांना ही नाटिका प्रौढ़ोसमार सादर करता यावी याकरीता उपासने च्या पुढाऱ्यांशी बोलून  व्यवस्था करा. मुलांना शिकावताना नाटिकेची तयारी करुन ह्या. मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी-नाटिकेतील काही भागच केला तरी चालेल.

- सर्व भूमिका करण्यासाठी पुरेसे लोक नसतील तर निवेदकाने त्या त्या भूमिकांचे संवाद वाचून दाखवावेत.
- भूमिका करणाऱ्यांनी त्यांचे मोठे संवाद थेट पवित्र शास्त्रातून वाचले तरी चालेल.
- प्रौढांनी किंवा मोठया माणयांनी बवाज, रुथ, नामी आणि निवेदक ह्या भूमिका कराव्यात . रूथकडे धान्य गोळा करण्यासाठीमोठे पोते वा डबा द्या,



लहान मुलांनी कापणी करणारा प्रमख आणि इतर कामकरी ह्या भूमिका कराव्यात. रूथकडे धान्य गोळा करण्यासाठी मोठे पोते वा डबा द्या, लहान मुलाांनी कापणी करणारा प्रमुख आणि इतर कामकरी ह्या भूमिका कराव्यात. काही कामकऱ्यांनी हातात विळा असल्याचा आभिनय करावा.

**निवेदक:** बवाज नावाच्या शेतकऱ्यांने हंगामाच्या काळात रूथ नावाच्या विधेववर दया केली हे रूथ अध्याय 2 मध्ये दाखवले आहे.''

**कामकरी:** ''काही जणांनी विळयाने धान्य कापण्याचा आभिनय करावा. काहीजणांनी धान्याच्या पेंढया बांघव्याचा अभिनय करवा आणि दुसरीकडे नेद्दन ठेवाव्यात. हे करीत असताना दोन स्त्राया बोलन असतात.

**रुथ:** कामकऱ्यांकडे बोट दाखवून नामीशी बोला (रुथ 2:2 मधून): ''सासूबाई, कृपा करुन मला शेतात जाऊ द्या म्हणजे कोणाची मजवर कृपाटृषिट झाल्यास त्याच्यामागून मी धान्याचा सरवा वेचीत जाईन.''

**नामी:** ''जा, मुली जा!'' (रुथ काही वेळ काम कऱ्यांच्या मागे जाऊन काही वेळ खाली पडलेले धान्य उच्चल असल्या आभिनय करते)

**बवाज:** ''कामकरी दादा, शुभप्रभात! प्रभू तुम्हांबरोबर असो!''

**मुकादम:** (कामकऱ्यांजवळ उभे राहा) सुप्रभात, बवाज !प्रभू तुम्हांला आशीर्वाद देवो!''

**बवाज:** काही वेळ रुथकडेपाहून मग सेवकाला म्हणा, ''ही तरुण स्त्री कोणाची नातेवाईक आहे?''

**मुकादम:** (रूथ 2:6-7 मधून)''ही तरुण स्त्री मवाबी असून ती नामी बरोबर मवाबहून आली. ती म्हणाली 'कृपा करुन कापणी करणाऱ्यांच्या मागून पेंढयांमधला सरवा मला वेचू द्या.''

**बवाज:** (रुथ 2:8-9 मधून म्हणा): '' ऐक, मुली , तू दुसऱ्यांच्या शेतात सरवा वेचावयास जाद्दु नको, येथेच माझ्या नोकरणींबरोबर राहा ज्या शेताची कापणी करीत आहेत त्याकडे नजर ठवून त्यांच्यामागून जा, तुला काही त्रास पोचू नये अशी आज्ञा मी या गडयास दिली ओह. तुला तहान लागल्यास तू भाडयाकडे जाद्दन गडयांनी भरून ठेवलेले पाणी पी.''



**रुथ:** बवाजसमोर दंडवत घोलून उठा मग म्हणा (रुथ 2:10 मधून) ''मज परक्या स्त्रीवर आपण कृपादृष्टी करुन माझा समाचार घेतला याचे काय कारण बरे?''

**बवाज:** (रुथ 2:11-12 मधून): ''तुझा पती मेल्यापासून तू आपल्या सासुशी कशी वागलीस व तू कशा प्रकारे आपली मातापितरे व जन्मभूमी सोडून तुला अपरिचित अशा लोकांत आलीस, ही सविस्तर हकीकत मला समजली आहे. परमेखर तुझ्या कृतीचे तुला फळ देवो. इस्राएलाचा देव परमेश्वर याच्या पंखांरवली तू आश्रयास आली आहेस, तो तुला पुरे पारितोषिक देवो.''

**रुथ:** (रुथ 2:13 मधून): ''महाराज आपली कृपादृष्टी मजवर राहु द्यावी, मी आपल्या कोणत्याही दासीच्या बरोबरची नसून आपण मजशी ममतेने बोलून माझे समाधान केले आहे.''

**बवाज:** (रुथ 2:14 मधून): ''इकडे ये, भाकरी खा, ह्या कढीत आपली भाकरी बुडीव.''

**निवेदक:** (रुथ 2:14-15 मधून) त्याकापणी करणाऱ्यांच्या पंक्तीस ती बसली व त्यांनी तिला हुरडा दिला,तो तिने पोटभर खाल्ल्यावर काही शिल्लक राहिला.''

**बवाज:** (सेवकांांडे जाहुन म्हणा, रुथ (2:15-16 मधून): तिला पेंढयांत वेचू द्या, मना करु नका,आणि चालता चालता पेंढयांतून मूठमूठ टाकीत जा, तिला वेचू द्या, तिला धमकावू नका.''

**निवेदक:** (रुय 2:17-18 (मधून): तिने या प्रकारे संध्याकाळ पर्यन्त सरवा वेचला. तिने वेचून आणिलेला सरवा झोडिला त्थचे एफाभर सातू निघाल निघाले. ते घहुन ती नगरात मोली तिने काय वेचून आणिले तिच्या सासूने पाहिले.''

**नामी:** (रुथ 2:19 व 20 मधून): ''आज तू कोठे सरवा वेचिला? हे झम तू कोठे केलेस? ज्याने तुझा समाचार घेतला त्याचे कल्याण होवो.''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्यांचे आभार माना,आणि पुढे स्पष्ट करुन सांगा'' बवाज रूथचे लग्न झाले. त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव ओबेद ठेवले. पुढे हया ओबेदला इशाय झाला.हा इशाय म्हणजे इस्राएलाचा थोर राजा दावीदाचे वडील होय. ख्रिस्ता व्यतिरिक्त पवित्र शास्त्र दावीदवगळता अन्य कोणत्याही मनुष्या बद्दल अधिक बोलत नाही. येशू हा बवाज व रुथ हयांचा वंशज आहे.



चित्र मुलांना धान्याच्या पेंढयांचे किंवा विळयाचे चित्र काढायला सांगा. मोठया माणसांना हे चित्र दाखवून आपण सुगी आणि इतर आर्शावादांबद्दल देवाला धन्यवाद दिले पाहिजेत असे त्यांनी स्पष्ट करावे.

**पाठ करा रुथ 2:12**

उपकार स्तुती संबंधीची वचने. दोन मुलाना यशया 9:3 आणि 2 करिंथ 9:11 ही वचने म्हणायाला सांगा सुगी आणि देवाचे इतर अनेक आशी र्वाद यासाठी देवाची उपकास्तुती करणारी, गाणी, कविता किंवा छोटीशी नाटिका मोठया मुलांना लिहिण्यास सांगा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net